दैनिक
आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ६ । अंक ३९ । शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

आधारवड

शब्द अपुरे... दुःख अथांग !

स्व. भानुदास एकनाथ कोतकर

स्व. शनिवार, दि. २४/१०/२०२६

आपल्या पावन स्मृतीस

विनम्र अभिवादन!

।। दशक्रिया विधी ।।

सोमवार, दि. ०२.११.२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा.

स्थळ : कोतकर मळा, एकनाथ नगर, केडगाव (देवी), अहिल्यानगर

-: दुःखांकित :-

गं.भा.सुरेखा भानुदास कोतकर (पत्नी)

श्री. बाळासाहेब एकनाथ कोतकर (भाऊ)
श्री. महादेव एकनाथ कोतकर (भाऊ)
श्री. संदीप भानुदास कोतकर (मुलगा)
सौ. चंद्रकला देविदास अकोलकर (बहीण)
श्री. सचिन भानुदास कोतकर (मुलगा)
सौ. सुवर्णा सचिन जगताप (मुलगी)
श्री. अमोल भानुदास कोतकर (मुलगा)

समस्त कोतकर परिवार

टीप : ह. भ. प. शंकर महाराज शेवाळे यांचे सकाळी ८ वा. प्रवचन होईल.

SVA9850514775

दै. आकर्षण निवडक

भक्तीचा ताल अन् आधुनिकतेचा ठेका!

अहिल्यानगर- भारतीय भक्तिसंगीताची आध्यात्मिक समृद्धी आणि आधुनिक संगीताची ऊर्जा यांचा अनोखा संगम अनुभवण्याची पर्वणी अहिल्यानगरकरांना मिळणार आहे. अनाहत एक कलासृष्टी प्रस्तुत 'द भक्ती बीट्स देव देश धर्म' या अभिनव संकल्पनेतून 'भजन जॅमिंग अँड फ्युजन' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. महावीर ग्रुप यांच्या विशेष सहकार्यातून, तर विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या विशेष सहयोगातून हा भक्तिरसपूर्ण सांगीतिक सोहळा रंगणार आहे. भक्तिसंगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. पारंपरिक भजनांमधील भक्तिभाव, भावस्पर्शी शब्द आणि आध्यात्मिक ऊर्जा यांना आधुनिक संगीतशैलीची जोड देऊन नव्या पिढीला भारतीय भक्तिसंगीताशी जोडण्याचा अभिनव प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. 'देव, देश आणि धर्म' या मूल्यांचा संगीताच्या वैश्विक भाषेतून जागर करताना पारंपरिक भक्तिसंगीताचा आत्मा आणि त्यातील पावित्र्य जपण्याचा विशेष प्रयत्न या संकल्पनेतून केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पारंपरिक भारतीय संगीत वाद्ये आणि आधुनिक वाद्यांचा अनोखा संगम असणार आहे. तबला, पखवाज, हार्मोनियम आणि ढोलक यांसारख्या पारंपरिक वाद्यांसोबत गिटार, की-बोर्ड आणि आधुनिक तालवाद्यांची सुरेल साथ रसिकांना अनुभवता येणार आहे. भक्तिरसपूर्ण गायन, पारंपरिक सुरावटी, दमदार ताल आणि आधुनिक फ्युजन यांच्या माध्यमातून भजनांचा एक वेगळाच संगीताविष्कार सादर केला जाणार आहे. त्यामुळे पारंपरिक भजनांचा आनंद घेतानाच आधुनिक संगीताची ऊर्जा अनुभवण्याची संधी संगीतप्रेमींना मिळणार आहे. या सांगीतिक सोहळ्याला आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, समर्थभक्त मंदारबुवा रामदासी, सेंट्रल बँकेचे मुख्य प्रबंधक नरेश कुमार दुबे, नागेश्वरी भोसले, साईदिप हिरोचे सचिन बोरा, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे आणि मनोज झंवर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमात उमेशराज साळुंके, गणेश बैरागी, सौरभ साठे, गौरी रत्नपारखी, महेशराज साळुंके, ज्ञानेश्वर पाठक, विधान बैरागी, भावेश राणे, किर्तेश बाविस्कर, सागर वाघमारे, धनंजय गोहेर, अनिकेत साळुंके आणि यश फुलारे हे गायक व वादक आपल्या कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर करणार आहेत.

महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर- महिलांमध्ये वाढत्या कॅन्सरच्या आजारांवर वेळीच नियंत्रण मिळवण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी सावेडी येथील अपंग संजीवन सोसायटीच्या मूकबधिर विद्यालय तसेच डी.बी. फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयामध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विद्यालयाच्या ज्येष्ठ संचालिका विद्याभावले यांनी दिली. माता-भगिनींसाठी आरोग्याची ही एक सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली असून, प्रवेश पूर्णपणे विनामूल्य आहे. या शिबिरामध्ये मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या व सध्या विखे मेमोरियल हॉस्पिटल अहिल्यानगर येथे कार्यरत असलेल्या कर्करोगतज्ज्ञ डॉ. प्रियंका पठारे या प्रमुख मार्गदर्शन व व्याख्यात्या म्हणून उपस्थित राहणार असून सामाजिक कार्यकर्त्या किरणताई बारस्कर आणि डॉ. अश्विनीताई बोरुडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. आधुनिक काळात महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे. या शिबिरात आरोग्यविषयक मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे कॅन्सरची प्राथमिक लक्षणे व ओळख ,कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे कशी ओळखावीत, जेणेकरून आजार बळावण्यापूर्वीच त्यावर उपचार करणे शक्य होईल.

आईच्या काळजाचा आक्रोश! चार वर्षांची चिमुकली कोमात; उपचारासाठी समाजाच्या मदतीची गरज

नियतीचे दुहेरी संकट! घटस्फोटानंतर मुलीच्या गंभीर आजाराशी आईचा संघर्ष; उपचारासाठी आर्थिक मदतीचे आवाहन | चिमुकलीच्या आयुष्यासाठी आईची धडपड; मेंदूच्या गंभीर आजारामुळे उपचारांचा खर्च आवाक्याबाहेर

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– एका बाजूला घटस्फोटानंतर आयुष्याचा संघर्ष आणि दुसऱ्या बाजूला चार वर्षांच्या चिमुकलीचा गंभीर आजार... अशा दुहेरी संकटाचा सामना करणाऱ्या प्रियंका संतोष बिल्लांडे या आईला आता समाजाच्या मदतीची गरज निर्माण झाली आहे. त्यांच्या चार वर्षीय मुलीला मेंदूशी संबंधित गंभीर आजाराने ग्रासले असून, सध्या ती कोमात असल्याची माहिती आहे. मुलीच्या पुढील उपचारांसाठी डॉक्टरांनी मोठ्या खर्चाची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. मात्र, आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने मुलीचे उपचार सुरू ठेवणे आईसाठी कठीण झाले आहे. त्यामुळे दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि मदतीसाठी पुढे येणाऱ्या नागरिकांनी आर्थिक हातभार लावावा, असे भावनिक आवाहन करण्यात आले आहे.

प्रियंका बिल्लांडे या सध्या अहिल्यानगरमधील तपोवन रोड परिसरात आपल्या माहेरी वास्तव्यास आहेत. मुलीच्या जन्मानंतर त्यांना वैवाहिक आयुष्यात अडचणींचा सामना करावा

लागला आणि घटस्फोटाला सामोरे जावे लागले. मुलीच्या संरक्षणासंदर्भातील प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. अशा परिस्थितीत मुलीच्या संगोपनाची आणि उपचारांची संपूर्ण जबाबदारी पेलण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर उभे राहिले आहे.

जन्मानंतर काही काळातच या चिमुकलीला गंभीर आजाराचा सामना करावा लागला. तिच्यावर माळीवाडा येथील महालक्ष्मी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. या उपचारांवर कुटुंबीयांनी आतापर्यंत मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. उपचारांमुळे काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले; मात्र त्यानंतर मुलगी कोमात गेली. मेंदूशी संबंधित विकारामुळे पुढील उपचार आवश्यक असून, त्यासाठी मोठा खर्च येणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

प्रियंका बिल्लांडे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. त्यांचे वडील एका खासगी दुकानात काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने आतापर्यंतचा उपचारांचा खर्च पेलताना कुटुंबाची आर्थिक ओढाताण झाली आहे. आता पुढील उपचारांसाठी आवश्यक असलेली मोठी रक्कम उभी करणे त्यांच्यासाठी अशक्यप्राय झाले आहे.एका आईसाठी आपल्या चिमुकलीला पुन्हा निरोगी पाहण्यापेक्षा मोठे स्वप्न कोणतेच नसते. मात्र, आर्थिक अडचणींमुळे मुलीच्या उपचारांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. आपल्या छोट्याशा मदतीतूनही या चिमुकलीच्या उपचारांना मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे नागरिकांनी शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करून माणुसकीचे नाते जपावे, असे आवाहन करण्यात आले आहे.आर्थिक मदतीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा : सावेडी, अहिल्यानगर, खाते क्रमांक : ६०२३१५१७०६४ किंवा यूपीआय नंबर ७६६६२३००१८

प्रेम, साधेपणा आणि एकत्वाचा संदेश देत संपन्न झालेल्या निरंकारी सामूहिक विवाह सोहळ्यात १२६ जोडपी विवाहबद्ध

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिथे सद्गुरूंचा पावन आशीर्वाद, प्रेम आणि अध्यात्मिकतेचा सुंदर संगम असतो, तिथे प्रत्येक मंगलमय क्षण हा दिव्य अनुभूती बनतो. ७९ व्या निरंकारी संत समागमाच्या समारोपानंतर समालखाच्या आध्यात्मिक स्थळ मैदानावर सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या दिव्य उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला सामूहिक विवाह सोहळा याच अध्यात्मिक भावनेचे सुंदर प्रतीक ठरला. या सोहळ्यात १२६ नवविवाहित जोडपी विवाहबंधनात बांधली गेली आणि त्यांनी आपल्या नवजीवनाचा शुभारंभ केला. तसेच सद्गुरूंचा प्रेम, समर्पण आणि सुखमय वैवाहिक जीवनासाठी आशीर्वाद प्राप्त केला.

कार्यक्रमाचा शुभारंभ पारंपरिक जयमाला आणि निरंकारी सांझा-हाराने झाला. मिशनच्या प्रधान आ. राजकुमारी जी तसेच इतर कार्यकारिणी सदस्यांनी सर्व नवविवाहित जोडप्यांना सांझा-हार घालून त्यांच्या सुखमय नवजीवनासाठी मंगलकामना केल्या. त्यानंतर हिंदी भाषेत भक्तिमय निरंकारी लावांचे गायन करण्यात आले. या लावांमध्ये विश्वास, सन्मान आणि समर्पणाने परिपूर्ण गृहस्थ जीवनाच्या सुंदर शिकवणींचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी सद्गुरु माता जी आणि निरंकारी राजपिता जी यांनी नवविवाहित जोडप्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांना सुख, शांती आणि आनंदमय जीवनाचा आशीर्वाद प्रदान केला.

सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी आपल्या आशीर्वचनांमध्ये नवविवाहित जोडप्यांना प्रेरणा देताना सांगितले की, विवाह हा केवळ दोन व्यक्तींमधील संबंध नसून प्रेम, आदर आणि समर्पणाने आयुष्यभर जपला जाणारा पवित्र बंध आहे. दोन्ही कुटुंबांमध्ये परस्पर सन्मान, प्रेम आणि आपुलकीची भावना वाढीस लागल्यास हा बंध आणखी दृढ होतो. एकमेकांच्या कमतरता सहजतेने स्वीकारणे, चुका झाल्यास क्षमा करणे आणि प्रत्येक परिस्थितीत नम्रतेची भावना कायम ठेवणे, हे सुखी वैवाहिक जीवनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, असा संदेश सद्गुरु माता जी यांनी शेवटी दिला.

इस्त्रो शैक्षणिक सहल प्रवेश परीक्षेत दूर्वा बेरड जिल्ह्यात अव्वल!

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनीचा सन्मान | निंबोडी जिल्हा परिषद शाळेची गुणवत्तापूर्ण उपक्रमांमधील यशस्वी परंपरा कायम

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित इस्त्रो शैक्षणिक सहल प्रवेश परीक्षेच्या अंतिम जिल्हास्तरीय यादीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निंबोडी, ता. नगर येथील विद्यार्थिनी दूर्वा बेरड हिने जिल्ह्यात अव्वल क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक भास्कर पाटील यांच्या हस्ते दूर्वाचा नुकताच सन्मान करण्यात आला.

इयत्ता सहावीच्या गटातून दूर्वा बेरड हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. नियमित अभ्यास, सखोल मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर तिने हे यश संपादन केले. तिच्या या कामगिरीमुळे निंबोडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

यावेळी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील म्हणाले की, निंबोडी शाळेने सातत्याने विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे. सलग दोन वर्षे या शाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी जाण्याची संधी मिळाली असून, शाळेची गुणवत्तेतील आघाडी कायम आहे.

'रीडिंग बेल', 'कुसुमाग्रज वाचनालय', 'माझी आदर्श शाळा', 'मिशन आरंभ' आणि 'मिशन आपुलकी' यांसारखे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळत असून, जिल्हा परिषद अहिल्यानगर राज्यात अव्वल ठरण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असे पाटील यांनी नमूद केले.

दूर्वा बेरड हिच्या या घवघवीत यशाबद्दल गटविकास अधिकारी अक्षय गोर्डे, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, सरपंच जयरामशेठ बेरड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन गवळी, विस्ताराधिकारी प्रवीण बेलदार आणि केंद्रप्रमुख भास्कर नरसाळे यांनी तिचे अभिनंदन केले.

पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना १५ हजार रुपये मानधन द्या महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाचे आमरण उपोषण

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्र शासनाकडून विविध समाजभूषण व सामाजिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेल्या समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. महासंघाचे राज्याध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार, संत रोहिदास पुरस्कार, भगवान बिरसा मुंडा पुरस्कार तसेच अन्य शासकीय पुरस्कारांनी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. मात्र, पुरस्कार मिळाल्यानंतरही या समाजसेवकांना शासनाकडून कोणतेही नियमित मानधन किंवा आर्थिक मदत मिळत नसल्याची खंत महासंघाने व्यक्त केली आहे.

अनेक पुरस्कारप्राप्त समाजसेवकांनी आपल्या आयुष्यातील ५० ते ६० वर्षे समाजकार्यासाठी खर्ची घातली आहेत. समाजातील वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला असून, अनेकांना शासनाच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे. मात्र, आता यातील बहुतांश कार्यकर्ते वृद्धापकाळात आहेत. उत्पन्नाचे साधन आणि आर्थिक आधार नसल्याने त्यांना दैनंदिन जीवन जगणेही कठीण झाले आहे. त्यामुळे स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणे पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये पेन्शन स्वरूपात मानधन देण्यात यावे. संबंधित पुरस्कारप्राप्त व्यक्तीचे निधन झाल्यास हे मानधन त्यांच्या पत्नीला देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही, शिवनेरी, हिरकणी, शिवाई, स्लीपर यांसह सर्व प्रकारच्या एसटी बसमधून पुरस्कारप्राप्त व्यक्ती व त्यांच्या एका साथीदाराला विनामूल्य प्रवासाची सुविधा देण्यात यावी, अशीही मागणी महासंघाने केली आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी जागेचा प्रश्न

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी अहिल्यानगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथे जागा उपलब्ध करून देण्याचा प्रश्नही या आंदोलनातून उपस्थित करण्यात आला आहे. सन २०१७ मध्ये दलित महासंघाच्या माध्यमातून शासकीय मालकीच्या जमिनीवर स्मारक उभारण्यासाठी पहिली अधिकृत मागणी करण्यात आल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. या प्रस्तावाचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी शिफारस केली होती. त्यानंतर १० नोव्हेंबर २०१७ रोजी नाशिक विभागीय महसूल आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

धार्मिक कार्यातून संतांच्या विचारांचा वारसा जोपासला जातो – आमदार संग्राम जगताप

साईराम नगर येथील श्री साईबाबा मंदिर सभामंडपाचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकार्पण!

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– महानगरपालिका प्रभाग क्रमांक एकमधील साईराम नगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून श्री साईबाबा मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण करण्यात आले. या सभामंडपाचा लोकार्पण सोहळा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या सुविधेमुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांना धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध झाली आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राची भूमी साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. संतांनी दिलेले विचार आणि शिकवण यांचा वारसा अखंडितपणे पुढे सुरू राहण्यासाठी धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणे गरजेचे आहे. धार्मिक कार्याच्या माध्यमातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचतात आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ होण्यास मदत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या माध्यमातून प्रभागात विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. त्याचबरोबर धार्मिक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी मंदिरांसमोर सभामंडपांची उभारणी केली जात आहे. साईराम नगर येथील श्री साईबाबा मंदिर हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावण्यावर भर दिला जात असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक एक हा नव्याने विकसित होणारा भाग असून, येथे मूलभूत सुविधांपासून विकासकामे करावी लागली आहेत. या कामांसाठी आमदार संग्राम जगताप यांचे मोठे योगदान लाभले असून, त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून प्रभागात कायमस्वरूपी स्वरूपाची विकासकामे मार्गी लागत आहेत.

प्रभागातील धार्मिक कार्यक्रमांना प्रोत्साहन मिळावे आणि नागरिकांना मंदिर परिसरात विविध धार्मिक व

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून १५ किलो वजनाची अंडाशयाची गाठ यशस्वीरीत्या काढली

अवघ्या तीन तासांत आव्हानात्मक शस्त्रक्रिया; रुग्णाची प्रकृती उत्तम

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

अहिल्यानगर– डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आलेली ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असून तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली आहे.

सदर महिला रुग्णाच्या पोटामध्ये मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. या गाठीमुळे पोटावर मोठा ताण निर्माण होऊन रुग्णाला श्वास घेण्यास, लघवी करण्यास तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्यामुळे रुग्णाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत होता. तपासणीनंतर ही अंडाशयाची गाठ असल्याचे निदर्शनास आले. गाठीचा प्रचंड आकार आणि तिची इतर अवयवांशी झालेली चिकटण ही शस्त्रक्रियेतील प्रमुख आव्हाने होती.

या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये डॉ. अद्वैत वैद्य (कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ) आणि डॉ. दीपक गाडेकर (मूत्रविकार तज्ञ) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेदरम्यान गाठ आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने विशेष काळजी आणि कौशल्याची आवश्यकता होती. रुग्णाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉक्टरांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि सुमारे १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली.

वृद्ध वयातील रुग्ण, गाठीचा मोठा आकार आणि इतर अवयवांशी असलेली चिकटण या सर्व बाबी लक्षात घेता ही शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. मात्र, तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य, योग्य उपचारनियोजन आणि रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असल्याने रुग्णालयातील डॉक्टर व उपचार पथकाने समाधान व्यक्त केले. माननीय नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयात सुपर स्पेशलिटीच्या सोई सुविधा गोरगरिबांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडणे हे रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यक्षमता, वैद्यकीय अनुभव आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीचे द्योतक आहे. समाजातील सर्व स्तरांतील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या रुग्णालयाच्या प्रयत्नांना या यशामुळे आणखी बळ मिळाले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

प्रियदर्शनी ज्युनियर कॉलेजच्या रुद्रप्रताप मुळेची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड

अहिल्यानगर - क्रीडा व युवक सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य) पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज इ. १२ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी रुद्रप्रताप गणेश मुळे याने बारामती येथे झालेल्या विभागीय शालेय कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला असून, त्याची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला क्रीडा प्रशिक्षक आशिष भिंगारदिवे, प्रवीण शिर्के, सागर फाटके, अल्ताफ खान यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, संस्थेचे व शाळेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आणि भविष्यकालीन स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

क्रीडा शिक्षक कदम यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान

अहिल्यानगर - शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयाचे क्रीडा शिक्षक आप्पासाहेब नामदेव कदम यांना शिर्डी येथील बी. द. चेंज फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल नवनाथ विद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. नवनाथ विद्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने कदम यांचा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी सत्कार केला. आप्पासाहेब कदम यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात शिस्त, संघभावना, आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण व्हावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षक हा केवळ पुस्तकी ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. क्रीडा क्षेत्रातून विद्यार्थ्यांमध्ये मेहनत, चिकाटी, खिलाडूवृत्ती आणि पराभवातून पुन्हा उभे राहण्याची ताकद निर्माण होते. या दृष्टीने कदम यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली. मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी कदम यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अधिकृत दुकानासमोर अतिक्रमणाचा विळखा; गाळेधारक त्रस्त!

अहिल्यानगर- अहिल्यानगर शहरातील कोठला परिसरातील राज चेंबर्स येथील अधिकृत दुकानासमोरील कथित अतिक्रमणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दुकानासमोर काँक्रीटचे बांधकाम तसेच दुचाकी व इतर वाहने उभी केली जात असल्याने व्यवसायावर परिणाम होत असून ग्राहकांनाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार शाह प्लंबिंग अँड हार्डवेअरचे दुकानदार महेमुद खान कादर खान यांनी केली आहे. या प्रकरणाची तातडीने पाहणी करून अतिक्रमण आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. महेमुद खान कादर खान यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या अधिकृत दुकानासमोर असलेल्या आमीर मोबाईल शॉपकडून दुकानासमोरील जागेत काँक्रीटचे बांधकाम करण्यात आले आहे. याशिवाय दुकानासमोर दुचाकी व अन्य वाहने सातत्याने उभी केली जात असल्याने परिसरातील गाळेधारकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या ‘चूजिंग गोल्ड’ आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ‘पीएनजी ज्वेलर्स’चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या ‘चूजिंग गोल्ड’ या आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन पुण्यात प्रसिद्ध मराठी अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ऑगस्ट २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी आवृत्तीनंतर अवघ्या तीन महिन्यांच्या आत हे पुस्तक मराठी वाचकांच्या भेटीला आले आहे. पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड येथील दालनात हा प्रकाशन सोहळा पार पडला. याच प्रसंगी दालनाचा २५ वा वर्धापनदिनही साजरा करण्यात आला. भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सचा १९४ वर्षांचा वारसा पुढे नेताना डॉ. सौरभ गाडगीळ यांनी अनुभवलेले चढ-उतार, घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास ‘चूजिंग गोल्ड’ या आत्मचरित्रातून उलगडतो. पेंग्विन रँडम हाऊस इंडियातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीला ऑगस्ट महिन्यात वाचकांसमोर आणण्यात आले होते. आता मराठी आवृत्तीच्या माध्यमातून डॉ. गाडगीळ यांचा हा वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवास मराठी वाचकांपर्यंत पोहोचणार आहे.

चूजिंग गोल्ड’ हे केवळ एका यशस्वी व्यावसायिकाची कहाणी नसून, परंपरेची जबाबदारी स्वीकारताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा प्रामाणिक लेखाजोखा आहे. पीएनजी ज्वेलर्सचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर डॉ. गाडगीळ यांना अनेक महत्त्वाच्या निर्णयांना सामोरे जावे लागले. या प्रवासात त्यांना आलेले अनुभव, अपयशातून मिळालेली शिकवण, आजोबा आणि आई यांच्यासोबतचे आयुष्यभर स्मरणात राहिलेले संवाद तसेच त्यांच्या विचारांना आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे अनेक प्रसंग या पुस्तकात मांडण्यात आले आहेत. जवळपास दोन शतकांचा व्यावसायिक वारसा जपत बदलत्या काळानुसार व्यवसायाला नवी दिशा देण्यामागील त्यांची भूमिका आणि विचारही यातून समोर येतात.

या प्रसंगी पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, “‘चूजिंग गोल्ड’ची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित झाल्यापासून हे पुस्तक मराठीत कधी आणता येईल, याची मला उत्सुकता होती. मराठी ही माझी मातृभाषा आहे. त्यामुळे माझ्या आयुष्यातील अनुभव, निर्णय आणि शिकवण माझ्या स्वतःच्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचत आहे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. हे पुस्तक लिहिताना मला माझ्या आयुष्यातील अनेक प्रसंगांकडे पुन्हा एकदा पाहण्याची संधी मिळाली. काही निर्णय योग्य ठरले, काही चुकले, तर काहींचे महत्त्व अनेक वर्षांनंतर उमगले. या सगळ्या अनुभवांनी मला घडवले आहे. या प्रवासात माझ्या कुटुंबाचे संस्कार, पीएनजी ज्वेलर्सचा समृद्ध वारसा आणि आमच्या ग्राहकांनी दाखवलेला विश्वास यांचा मोठा वाटा आहे. मराठी वाचकांशी या पुस्तकाच्या माध्यमातून अधिक जवळून संवाद साधता येणार आहे, याचे मला विशेष समाधान आहे. माझ्या या प्रवासातील एखादा अनुभव जरी वाचकाला आयुष्यातील कठीण निर्णय अधिक आत्मविश्वासाने घेण्यासाठी उपयोगी पडला, तरी या पुस्तकाचा उद्देश सफल झाला, असे मी मानेन.”

या प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध मराठी अभिनेत्री श्रेया बुगडे म्हणाल्या, “डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या ‘चूजिंग गोल्ड’च्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशनाचा मान मला मिळाला, याचा खूप आनंद आहे. त्यातच पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड दालनाच्या २५ व्या वर्धापनदिनाचा हा विशेष प्रसंग असल्याने माझ्यासाठी हा दुहेरी आनंदाचा क्षण आहे.”

‘चूजिंग गोल्ड’च्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन हे डॉ. गाडगीळ यांच्या वैयक्तिक प्रवासातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. व्यवसायाच्या चौकटीपलीकडे जाऊन नेतृत्व, कुटुंब, नातेसंबंध, जबाबदारी आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व या पुस्तकातून मांडण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन; ३०० खेळाडूंचा सहभाग!

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे : शालेय क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून घडतात गुणवंत खेळाडू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांतील सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. किक बॉक्सिंग हा खेळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचत असल्याचे या स्पर्धेतील मोठ्या सहभागावरून स्पष्ट होत आहे.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध शालेय क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जिल्ह्यातील १०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. जिल्ह्यातील खेळाडू महाराष्ट्रात विविध क्रीडा प्रकारांमध्ये चांगली आगेकूच करत आहेत. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनीही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशनचे राज्याचे अध्यक्ष निलेश शेलार हे आंतरराष्ट्रीय स्तरावर किक बॉक्सिंगमध्ये भारताचे नेतृत्व करत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये क्रीडा आयोजनाच्या बाबतीत अहिल्यानगर जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. यंदा जिल्ह्यात १३ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसह कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. सन २०३६ मधील ऑलिंपिक आणि २०३२ मधील कॉमनवेल्थ गेम्स डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असून, प्रशिक्षण केंद्रांची निर्मितीही करत आहे.

मिशन लक्षवेधच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात पाच खेळांची जिल्हास्तरीय प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. शालेय क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडू घडत असतात. या स्पर्धांमुळे त्यांना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळते. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनीही जिद्द आणि सातत्याच्या जोरावर पुढील स्तरावर यश मिळवावे, अशा शुभेच्छा खुरांगे यांनी दिल्या.

असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष नितीन शेलार म्हणाले की, किक बॉक्सिंग हा खेळ आता थेट ग्रामीण भागापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेत सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. शालेय क्रीडा स्पर्धांमधून खेळाडू घडतात आणि विविध स्पर्धांना सामोरे जाण्याचा अनुभव त्यांना मिळतो. क्रीडा क्षेत्रात खेळाडूंसाठी करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. शासनाच्या नोकऱ्यांमध्येही खेळाडूंसाठी पाच टक्के आरक्षणाची तरतूद आहे.

प्रत्येक खेळाडूने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. कोणत्याही खेळात सातत्य राखणे महत्त्वाचे असून, त्यातूनच यशाचा मार्ग सुकर होतो. १४, १७ आणि १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी या जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, यातील विजेते खेळाडू विभागीय स्तरावर खेळण्याची संधी मिळवतील, असे शेलार यांनी सांगितले.

या उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, सचिन मकासरे, जयेश आनंदकर, ओंकार झोडगे, माऊली जमदाडे, सचिन साळवे, प्रशांत बोऱ्हाडे, लखन शिंदे, गोकुळ सोलाट, अमोल कासार यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काष्टी येथील परिक्रमा पॉलीटेक्निकतर्फे दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

श्रीगोंदा– इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक गुणवत्ता, बौद्धिक क्षमता, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्राविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने परिक्रमा पॉलीटेक्निकच्या वतीने परिसरातील विविध माध्यमिक विद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी सामान्य क्षमता चाचणी आयोजित करण्यात आली. या चाचणीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनातच स्पर्धात्मक परीक्षांची ओळख व्हावी, स्वतःच्या बौद्धिक क्षमतेचे मूल्यमापन करता यावे आणि भविष्यातील शैक्षणिक व करिअरविषयक संधींची माहिती मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची प्रेरणा, आत्मविश्वास आणि गुणवत्ता वाढीस लागण्यास मदत होणार आहे.

या सामान्य क्षमता चाचणीत स्व. संजयराव पोपटराव भोसले माध्यमिक विद्यालय, निमगाव खलू येथील कातोरे सार्थक विकास, पिंपळे पुनित किशोर आणि प्रतीक धुळा करनोर; श्री खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, येळपणे येथील प्रणव पवार, अभिनव थोरात आणि जनार्दन थोरात; तसेच नवभारत विद्यालय, आनंदवाडी येथील अक्षरा सोनवणे, सार्थक खोडवे आणि कल्याणी लडके तसेच पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार माध्यमिक विद्यालय बाभूलसर मधील संस्कार रणदिवे,तनुजा जाधव,तेजस नागवडे. यांनी गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळविले.

त्याचप्रमाणे राज्य राखीव पोलीस पब्लिक माध्यमिक विद्यालय, दौंड, गट क्र. ७ येथील ईश्वरी योगेश चंदन, अनघा सचिन निघडे आणि प्रणवी बापू रोटे; श्री. गुप्तेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, मोरेवस्ती, कुरकुंभ येथील समीक्षा जनार्दन कुदळे, अश्विनी शिवलाल राठोड आणि सावल्या सुभाष ओहळ; तसेच परिक्रमा पब्लिक स्कूल येथील राजवर्धन खामकर, खुशी कुमार आणि ओजस्वी भोईटे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळविले.

या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन करून त्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे प्रोत्साहन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमात सहभागी शाळांचे मुख्याध्यापक श्री. घुटे दादासाहेब भिकाजी (स्व. संजयराव पोपटराव भोसले माध्यमिक विद्यालय, निमगाव खलू), श्री. विठ्ठल बुगणे (श्री खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, येळपणे), श्री. सुनील गिरमकर (नवभारत विद्यालय, आनंदवाडी), श्रीमती शुभांगी मोरे (राज्य राखीव पोलीस पब्लिक माध्यमिक विद्यालय, दौंड), श्री. मकरंद पवार (श्री. गुप्तेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कुरकुंभ), सौ. उषा गावडे मॅडम (बाभूळ सर)आणि डॉ. संजीव कदम-पाटील (परिक्रमा पब्लिक स्कूल) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.

परिक्रमा संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या गुणवत्तेची ओळख करून देण्याची आणि उच्च शिक्षणाच्या विविध संधींकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळत आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील संधींची माहिती देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिशा मिळावी, हा संस्थेचा प्रयत्न आहे. अशी माहिती परिक्रमा पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी सर व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अ‍ॅड.प्रतापसिंह बबनराव पाचपुते यांनी दिली.

देवदैठणच्या युगंधर वाघमारेची पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी

गोळाफेकमध्ये रौप्यपदक, थाळीफेकमध्ये कांस्यपदक; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

देवदैठण – देवदैठण येथील होतकरू खेळाडू युगंधर गणेश वाघमारे याने पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात गोळाफेक क्रीडा प्रकारात रौप्यपदक, तर थाळीफेक क्रीडा प्रकारात कांस्यपदक पटकावून आपल्या क्रीडाकौशल्याची चमक दाखवली आहे. विशेष म्हणजे, गोळाफेक या क्रीडा प्रकारात त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दि. ३० ऑक्टोबर रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुल, पिंपरी-चिंचवड येथे पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे जिल्हा, पुणे शहर, सोलापूर जिल्हा, सोलापूर शहर, अहिल्यानगर जिल्हा, अहिल्यानगर शहर आणि पिंपरी-चिंचवड शहर या विभागांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा चुरशीच्या स्पर्धेत युगंधरने दोन्ही क्रीडा प्रकारांत पदकांची कमाई करत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

युगंधरच्या या यशामागे त्याचे वडील पैलवान गणेश वाघमारे (राष्ट्रीय खेळाडू) यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले आहे. तसेच त्याचे आजोबा पैलवान नामदेव वाघमारे सर यांचेही बहुमोल मार्गदर्शन त्याला घरातूनच मिळाले. घरातूनच लाभलेला क्रीडा वारसा, सातत्यपूर्ण सराव, जिद्द, मेहनत आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन यामुळे युगंधरने हे यश संपादन केले आहे.

युगंधरच्या या दैदिप्यमान यशामुळे देवदैठण गावासह परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही तो उत्तुंग यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. युगंधरचे हार्दिक अभिनंदन आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

शाळेच्या ऋणानुबंधातून आर्य चाणक्य विद्यालयाला एक लाखांची मदत

माजी विद्यार्थ्याच्या पालकांकडून शाळेच्या इमारत बांधकामासाठी आर्थिक हातभार; सतीश लखोटिया यांचा आदर्श उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– शिक्षण घेतलेल्या शाळेशी निर्माण झालेले ऋणानुबंध आयुष्यभर कायम राहतात, याचा प्रत्यय पैठण येथील आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिराच्या इमारत बांधकामासाठी मिळालेल्या आर्थिक मदतीतून आला आहे. गजानन ट्रेनिंग कंपनीचे संचालक तथा होलसेल किराणा व्यापारी सतीश लखोटिया यांनी शाळेच्या नवीन इमारत बांधकामासाठी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. सतीश लखोटिया यांचा मुलगा बालवाडीपासून ते दहावीपर्यंतचे शिक्षण याच आर्य चाणक्य विद्यालयात पूर्ण करून गेला आहे. त्यामुळे या शाळेशी लखोटिया कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे. मुलाच्या शैक्षणिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या शाळेच्या विकासासाठी काहीतरी योगदान द्यावे, या आपुलकीच्या भावनेतून त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिराच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शाळेची इमारत उभारण्यात येत आहे. या बांधकामासाठी लखोटिया यांनी दिलेली मदत निश्चितच मोलाची ठरणार आहे. शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेणे, ही इतरांसाठीही प्रेरणादायी बाब ठरत आहे. लखोटिया यांच्या या सहकार्याबद्दल आर्य चाणक्य परिवाराच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

आयएमएस – एम बी ए पालक-शिक्षक मेळावा उत्साहात संपन्न: संवादातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (), अहिल्यानगर येथे शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी एमबीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून पालक-शिक्षक मेळाव्याची उद्दिष्टे स्पष्ट केली. संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता यांनी भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्था आणि आयएमएसच्या समृद्ध शैक्षणिक परंपरेचा व संस्थेच्या वाटचालीचा परिचय करून दिला. उप संचालक डॉ विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेली आचारसंहिता, शिस्त यांवर प्रकाश टाकला. एम बी ए विभागप्रमुख डॉ. हातिम कय्युमी यांनी विभागाच्या अपेक्षा तसेच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच

प्रा. श्रुती राव यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या प्लेसमेंटविषयक संधींची माहिती दिली.

औपचारिक कार्यक्रमानंतर पालकांचे विविध गट तयार करून प्रत्येक गटासोबत प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली. या संवाद सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह विविध प्रशासकीय बाबींवर चर्चा करण्यात आली. पालकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे व प्रश्नांचे निरसनही प्राध्यापकांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एम बी ए प्रथम वर्षाचे वर्ग समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर, पीटीएम - समिती तसेच व्यवस्थापन विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप डॉ. सय्यद यांनी मानलेल्या आभारप्रदर्शनाने झाला.

स्व.शंकरराव घुले माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेच्या १५ टक्के लाभांश वाटपास प्रारंभ

माथाडी कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्था कटिबद्ध; जास्तीत जास्त कामगारांनी सभासद व्हावे – चेअरमन भोसले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– मार्केट यार्ड येथील स्वर्गीय शंकरराव घुले माथाडी कामगारांच्या सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के लाभांश (डिव्हिडंड) वाटप करण्यास प्रारंभ करण्यात आला. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक लाभ मिळवून देण्याबरोबरच माथाडी कामगारांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे नियोजन आणि मार्गदर्शकांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरत आहे. पतसंस्थेने यंदा सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेतला असून, हा लाभांश वाटपाचा उपक्रम सभासदांसाठी आनंददायी ठरत आहे. पतसंस्थेचे जास्तीत जास्त माथाडी कामगारांनी सभासद व्हावे आणि संस्थेच्या आर्थिक वाटचालीत सहभागी व्हावे, असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले यांनी यावेळी केले.

पतसंस्थेचे मार्गदर्शक तथा जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कारभार अत्यंत सुरळीतपणे सुरू आहे. माथाडी कामगार हा आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे, त्याला आर्थिक अडचणीच्या काळात संस्थेचा आधार मिळाला पाहिजे, या उद्देशाने पतसंस्थेचे कामकाज सुरू आहे. सहकाराच्या माध्यमातून कामगारांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेने आर्थिक प्रगती साधली असून, त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून सभासदांना १५ टक्के लाभांश वितरित करण्यात येत आहे. संस्थेच्या माध्यमातून भविष्यातही सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यावर संचालक मंडळाचा भर राहणार असल्याचे तज्ज्ञ संचालक संजय घुले यांनी आपल्या मनोगतात सांगितले. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांनी संस्थेशी जोडले जावे, नियमित व्यवहार करावेत आणि सहकाराच्या या चळवळीला बळ द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन नवनाथ बडे यांनी प्रास्ताविक करताना संस्थेच्या कामकाजाची माहिती दिली. माथाडी कामगारांच्या सहकारातून उभ्या राहिलेल्या या पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले, व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, तज्ज्ञ संचालक संजय घुले, संचालक आदिनाथ चेके, मच्छिंद्र दहिफळे, लक्ष्मण वायभासे, सागर पोळ, मंदाबाई सूर्यवंशी, रतनबाई आजबे, राम सरोदे, सचिव बबनराव सुसे यांच्याहस्ते रेल्वे मालधक्का वरील कामगार संतोष वाघमारे यांचा सन्मान करण्यात आला यावेळी कौसर पठाण, शाहूल वडागळे आदी उपस्थित होते. संचालक आदिनाथ चेके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

समाजाला नवी दिशा देणाऱ्या आणि प्रेरणास्त्रोत ठरणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा 'नारी सन्मान शक्तीचा' पुरस्काराने गौरव होणार

कायनेटिकचे संचालक शशिकांत गुळवे यांची माहिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देताना आपल्या कर्तृत्वाने आपल्या कार्यातून समाजाला नवी दिशा देणाऱ्या आणि प्रेरणास्त्रोत ठरणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना येथील कायनेटिक इंजिनियरिंग लि., या नामवंत उद्योगसमूहांच्या वतीने 'नारी सन्मान शक्तीचा'पुरस्काराने गौरवण्यात येणार असल्याची माहिती कायनेटिकचे संचालक श्री शशिकांत गुळवे यांनी दिली.

हा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी दिनांक १ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता कायनेटिक इंजिनियरिंग येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिक माहिती देतांना कार्यक्रमाचे संयोजक श्री जयंत येलुलकर म्हणाले की, महिलांच्या कर्तृत्वाला वंदन करण्यासाठी कायनेटिक ने या वर्षी पासून पुरस्कार सुरू केला असून यावर्षी जिल्ह्यातील सौ प्रतिमा हेमंत कुलकर्णी, अकोले (एकल महिलांसाठी कार्य), सौ शिल्पा अजय धोपावकर(पत्रकारिता,समाजप्रबोधन) सौ विद्या अविनाश तरटे (आरोग्य कार्य) दिया राजेंद्र जासूद (अपंग, राष्ट्रीय क्रीडा), सौ वैशाली राजेश कुरापाटी (आस्थापना) यांना जाहीर झाला असून पुरस्काराचे वितरण अहिल्या नगर महापालिकेच्या महापौर श्रीमती ज्योतीताई गाडे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी नगरसेविका सौ अश्विनीताई लोंढे व नगरसेविका कमलताई कोतकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कायनेटिक उद्योग समूहाने गेल्या चाळीस वर्षांपासून अहिल्या नगरच्या उद्योगक्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून शहरातील विविध क्षेत्रात नेहमीच सहकार्य केले असून त्यांचे उत्पादन असलेल्या लुना मोपेड च्या माध्यमातून जगाच्या औद्योगिक नकाशावर जिल्ह्याचे नाव कोरले आहे.

या सोहळ्यासाठी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक श्री अजिंक्य फिरोदिया यांचे मार्गदर्शन असून महिलांच्या कार्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी साईदीप भगतची निवड!

राज्यातील १८० खेळाडूंमधून १८ जणांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी साईदीप आदेश भगत याची १४ वर्षांखालील गटातील राज्यस्तरीय शालेय फुटबॉल संघात निवड झाली असून, तो राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला तो एकमेव खेळाडू ठरला आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर येथे राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणीत राज्यातील १८० फुटबॉलपटूंनी सहभाग घेतला होता. त्यामधून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी १८ खेळाडूंची निवड करण्यात आली. या निवड यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील साईदीप आदेश भगत याने स्थान मिळविले.

साईदीपने आपल्या खेळातील कौशल्य, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर ही कामगिरी केली आहे. त्याच्या या निवडीमुळे श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी भर पडली आहे.

या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापिका अरुंधती भोकरे, माधवी जकल तसेच प्रशिक्षक प्रसाद पांडुळे, संजय गायकवाड आणि मंदा ताथेड यांचे मार्गदर्शन लाभले.साईदीपच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून त्याचे अभिनंदन होत असून, राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

आयएमएस–सीडसी दिवाळी शॉपिंग फेस्टिव्हलचे उत्साहात उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी अनबॉक्सिंग उपक्रमाच्या माध्यमातून सर्व महिला उद्योजिकांना एकत्रितपणे व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी भविष्यातही आयएमएस–सीडसीच्या महिला उद्योजकता विकासाच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याची घोषणा केली. महिला उद्योजिकांनी अशा संधींचा लाभ घेऊन आपल्या व्यवसायाचा विस्तार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

आयएमएसच्या स्कील एनहान्समेंट ॲण्ड एंटरप्रीन्यूरशीप डेव्हलपमेंट सेंटर (सीडसी)आयोजित 'दिवाळी शॉपिंग फेस्टिव्हल २०२६' चे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते गुलमोहर रोडवरील आम्रपाली गार्डन येथे उत्साहात संपन्न झाले. नरेंद्र फिरोदिया यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देऊन महिला उद्योजिकांशी संवाद साधला व त्यांच्या उत्पादनांचे कौतुक केले.कार्यक्रमास बी.पी.एच.ई. सोसायटीचे सचिव विशाल बार्नबस, आयएमएसच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांची प्रमुख उपस्थिती होती.

विशाल बार्नबस यांनी सीडसीच्या महिला उद्योजकता विकासासाठी सुरू असलेल्या कार्याचे कौतुक करून सहभागी उद्योजिकांना शुभेच्छा दिल्या. डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. एम. बी. मेहता आणि डॉ. विक्रम बार्नबस यांनीही महिला उद्योजिकांना प्रोत्साहन दिले. अहिल्यानगरमधील नागरिकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन महिला उद्योजिकांच्या व्यवसायाला हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी वैष्णवी पांढरे, श्रद्धा खांडकेकर आणि अंजली महाजन यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. व्यवसाय करताना आलेल्या अडचणी, मिळालेल्या संधी आणि अशा प्रदर्शनांमुळे उत्पादनांना मिळणारी बाजारपेठ याविषयी त्यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवादकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. ऋचा तांदूळवाडकर आणि प्रा. गौरी पाटील यांनी या संपूर्ण प्रदर्शनाचे नियोजन व आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

या प्रदर्शनात ६० हून अधिक स्टॉल्स सहभागी झाले आहेत. यामध्ये आकर्षक साड्या, ड्रेस मटेरियल, रेडिमेड ब्लाऊज, दिवाळी सजावटीच्या वस्तू, गिफ्ट आयटम्स, अगरबत्त्या, हस्तनिर्मित दागिने, मोत्यांचे व वनग्रॅम ज्वेलरी, दिवाळी फराळ तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आहेत. विशेष म्हणजे अहिल्यानगर, श्रीरामपूर आणि लातूर येथील महिला उद्योजिकांनीही खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले आहेत.

महिला उद्योजिकांना प्रशिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष बाजारपेठ, ग्राहकांशी संपर्क आणि व्यवसायवृद्धीच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सीडसी विविध प्रदर्शने, उद्योजकता विकास कार्यक्रम, कार्यशाळा आणि विपणनविषयक उपक्रमांच्या माध्यमातून महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देत आहे. हे विक्री प्रदर्शन १ नोव्हेंबर पर्यंत सुरू राहणार आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी विविध वस्तू, आकर्षक भेटवस्तू आणि रुचकर खाद्यपदार्थांची मेजवानी नागरिकांना येथे अनुभवता येणार आहे.

दिवाळीची खरेदी करण्याबरोबरच स्थानिक महिला उद्योजिकांच्या कष्टांना आणि त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्याची ही एक उत्तम संधी आहे. त्यामुळे अहिल्यानगरकरांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयएमएस–सीडसीतर्फे करण्यात आले आहे.

अहिल्यानगरमधील 'पारिजात चौक' होणार 'राजर्षी शाहू महाराज चौक'?

राजर्षी प्रतिष्ठानचा महापालिकेस विरोध व जोरदार मागणी!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील गुलमोहोर रोडवरील पारिजात चौकाचे नामकरण 'पारिजात चौक' करण्याच्या महापालिका प्रशासनाच्या प्रस्तावाला 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज सेवाभावी प्रतिष्ठाण' (ट्रस्ट) वतीने तीव्र हरकत घेण्यात आली आहे. या चौकाचे नामकरण 'राजर्षी शाहू महाराज चौक' करावे, अशी ठाम व सर्वसमावेशक मागणी करण्यात आली असून, यासंदर्भातील निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांना राजश्री प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने हरकतीचे निवेदन देण्यात आले यावेळी हर्षल बांगर, गोकुळ गोधडे, अनुप सत्राळकर, अजित सिद्दम, साहिल पवार, अजिंक्य शिंदे, गजेंद्र गोधडे, मनोज गोधडे, श्रीकांत भालके, आदित्य खाकाळ आदीसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजर्षी प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, गेल्या पंचवीस वर्षांपासून या प्रतिष्ठानाच्या माध्यमातून पारिजात चौक परिसरात विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. यामध्ये गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव तसेच विविध महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

गेल्या २५ वर्षांपासून या परिसरात सामाजिक सलोखा, महापुरुषांचे विचार आणि जनजागृती करण्याचे कार्य अविरत सुरू असल्याने, या चौकाला राजर्षी शाहू महाराजांचे नाव देणे हा त्यांच्या विचारांचा व सामाजिक कार्याचा खरा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन प्रतिष्ठानने केले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, सामाजिक समता, आरक्षण, बहुजनांचे उत्थान आणि सामाजिक न्यायासाठी समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्दिष्टानेच पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असे अधिकृत नामकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तरी महानगरपालिका प्रशासनाने महासभेत ठेवलेल्या नामकरणाच्या विषयाचा पुनर्विचार करावा, प्रतिष्ठानच्या २५ वर्षांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल घ्यावी आणि पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असा अधिकृत नामकरणाचा ठराव मंजूर करावा, अशी मागणी राजर्षी प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे.